**महाराष्ट्र शासन**

क्रमांक : व्हीएलएस १००१/(३८२/२००१)/प्राशि-३
शालेय शिक्षण विभाग
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२
दिनांक : ३ जुलै, २००२

प्रति,
सर्व शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद.

**विषय : सन २०००-२००१/२००१-२००२ या वर्षी खाजगी प्राथमिक शाळांना दिलेल्या परवानगीचे नूतनीकरण करण्याबाबत**

उपरोक्त विषयी आपणांस कळविण्यात येते की, सन २०००-२००१/२००१-२००२ या वर्षी जून २०००/२००१ पासून खाजगी प्राथमिक शाळा सुरु करण्यास ज्या संस्थाना शासनाकडून परवानगी देण्यात आली आहे अशा सर्व संस्थांना परवानगी देण्यात आली असल्याचे तात्काळ कळविण्यात यावे.

तसेच सन २०००-२००१/२००१-२००२ या वर्षीची प्राथमिक शाळा परवानगीची पत्रे/आदेश उशीरा मिळाल्यामुळे ज्या शैक्षणिक संस्था जून २०००/२००१ पासून शाळा सुरु करु शकल्या नाहीत, अशा संस्थांनी संबंधित ठिकाणी जून २००१/२००२पासून प्राथमिक शाळा सुरु केल्यास अशा संस्थांना नूतनीकरणाची परवानगी देण्याबाबत, सन २०००-२००१/२००१-२००२ या वर्षामध्ये दिलेल्या परवानगी संदर्भात, आपणांस प्राधिकृत करण्यात येत आहे. त्यानुसार ज्या संस्थांचे अर्ज आपणाकडे नूतनीकरणासाठी प्राप्त होतील, अशा संस्थांना आपल्या स्तरावर नूतनीकरणाची परवानगी देण्याबाबतची आवश्यक ती कार्यवाही तात्काळ करावी.

विवाचिंदरकर
**( वि. व. चिंदरकर )**
**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन**

प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित,
१) शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
२) सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक (बृहन्मुंबई वगळून)
३) निवड नस्ती, प्राशि-३

**(सन २०००-२००१ या वर्षा(जून २००० पासून) इंग्रजी माध्यमाव्यतिरिक्त इतर माध्यमाच्या नवीन खाजगी प्राथमिक शाळांना परवानगी देण्याबाबत शासनपत्र क्रमांक व्हीएलएस १०००/(५५७/२०००)/(१)/प्राशि-३, दिनांक : १९ जुलै, २००१ चे सहपत्र )**

| अ.क्र. | संस्थेचे नाव | शाळेचे ठिकाण | माध्यम | |
|---|---|---|---|---|
| | <u>जिल्हा - पुणे</u> | | | |
| १. | श्री शिवाजी मराठा शिक्षण संस्था, पुणे (१०३) | बारव, ता.जुन्नर, जि. पुणे | मराठी | जि.प.पुणे |
| २. | स्व. अंबरचंदजी मुनोत शिक्षण संस्था, सुंदरनगर, कात्रज, ता.हवेली, जि.पुणे (१०४) | कात्रज, जि.पुणे (विचारे) | मराठी | म.न.पा. पुणे |